


Title Code- MAHMAR-51647

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ    Mob- 9822720784    Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे    अंक : ७९६ वा    शनिवार    दि. ०८ जून २०२४    पृष्ठ ८    किंमत ३ रुपये

# उद्धव ठाकरे यांच्याकडे महाराष्ट्र तर दिल्लीत शरद पवार, काय असणार इंडिया आघाडीचा नवा फॉर्म्युला...

**वृत्तसंस्था/मुंबई**

२०१९ मध्ये उद्धव ठाकरे यांना भाजपपासून तोडून आघाडीत आणण्यासाठी शरद पवार यांचा मोठा सहभाग होता. त्यावेळेपासून आता लोकसभा निवडणुका २०२४ होईपर्यंत पवार यांनी भाजप विरोधी आघाडीचे प्रमुख निर्णयकर्त्यांची महत्वाची भूमिका बजावली आहे. त्याचवेळी पवार यांनी पक्ष फुटल्यानंतरही राज्यात आपला जनाधारही मजबूत केला आहे. बारामतीच्या बालेकिल्ल्यात कौटुंबिक कलहात कन्या सुप्रिया सुळे यांना त्यांनी विजय मिळवून दिला. परिस्थिती कशीही असो परंतु त्या परिस्थितीला कलाटणी देण्याचे बळ असणारे लढवय्या आहे हे त्यांनी महाराष्ट्राला दाखवून दिले आहे. तर दुसरीकडे शरद पवार यांच्यासोबतीने आणखी एक योद्धा उभा राहिला ते म्हणजे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे चिरंजीव आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे. नुकत्याच लागलेल्या निवडणुका निकालाने उद्धव हे वडील बाळासाहेब ठाकरे यांच्यापेक्षा कमी नाहीत हे सिद्ध झाले आहे. महाराष्ट्रात इंडिया आघाडीने लोकसभेच्या ४८ पैकी ३१ जागा जिंकल्या. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेना यूबीटी पक्षाला ९ जागा जिंकल्या. १३ जागा जिंकणाऱ्या काँग्रेसनंतर ते दुसऱ्या क्रमांकावर आहेत. तर, शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेस ८ जागांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे. पक्षात फूट पडली त्यावेळी उद्धव ठाकरे यांच्यासोबत ५ तर शरद पवार यांच्याकडे ३ खासदार होते. महाविकास आघाडीतील उद्धव ठाकरे यांनी २१ जागा लढविल्या. त्या तुलनेत त्यांना कमी यश मिळाले असले तरी प्रतिकूल परिस्थितीत ९ जागा निवडून आणण्याचे कसब त्यांनी दाखवून दिले. उद्धव ठाकरे यांच्यासाठी निकाल संमिश्र लागला असला तरी हातातून सारे काही गेले असताना त्यांनी हे यश संपादन केले हे मान्य करावेच लागेल.उद्धव ठाकरे हे शिवसेना पक्षाचे संस्थापक बाळासाहेब ठाकरे यांच्या मूलभूत विचारांपासून दूर गेल्याचा आरोप एकनाथ शिंदे यांनी केला. पण, त्याचा तो आरोप अद्याप खरा ठरलेला नाही. भाजपसोबत हिंदुत्वाच्या मुद्द्यावरून असलेले सर्वात जुने संबंध तोडूनही ठाकरे यांनी राज्यावर आपली पकड कायम ठेवली. लोकसभा निवडणूक प्रचारात प्रमुख भागीदार म्हणून त्यांची भूमिका लक्षणीय होती. त्यामुळेच ठाकरे यांचे लक्ष आता ऑक्टोबरमध्ये होऊ घातलेल्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीकडे लागले आहे. कोणत्याही परिस्थितीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीचा पर्यायाने शिवसेनेचाच मुख्यमंत्री बनवण्याच्या तयारीला ते आतापासूनच लागले आहेत. याचे कारण म्हणजे, शिवसेनेचे मूळ मराठी मतदार हे ठाकरे यांच्यासोबतच राहिले आहेत. त्यासोबतच ठाकरे यांनी मुस्लिम आणि दलित मतदारांना आपल्याबाजूने वळविण्यात यश मिळवले आहे. लोकसभेच्या निकालांवरून असेही दिसून आले आहे की महाविकास आघाडीच्या मित्रपक्षांमध्ये मतांचे प्रमाण वाढले आहे. राज्यात तीव्र सत्ताविरोधी लाटेत शेतकरी, नैसर्गिक संकट, बेरोजगारी, महागाई हे विषय घेऊन ठाकरे विधानसभा निवडणुकीच्या मिशन मोडमध्ये असतील.



महाराष्ट्रात विधानसभेच्या २८८ जागा आहेत. भाजपने २०१४ मध्ये १२२ आणि २०१९ मध्ये १०५ जागा जिंकल्या. सलग दोन निवडणुकांमध्ये १०० पेक्षा जास्त जागा जिंकणारा भाजप हा एकमेव पक्ष आहे. मात्र, दोन्ही निवडणुकांमध्ये शिवसेना आणि भाजप युती होती. मात्र, २०१९ च्या निवडणुकीनंतर मुख्यमंत्री पदावरून वाद निर्माण झाला. तेव्हापासून उद्धव ठाकरे हे भाजप विरोधातील राज्यातील सर्वात मोठा चेहरा म्हणून पुढे आले. भाजप नेते देवेंद्र फडणवीस आणि अमित शहा यांच्याशी त्यांचे कटू संबंध निर्माण झाले. कोणत्याही परिस्थितीत ते आता भाजपसोबत तडजोड करण्याच्या मनस्थितीत नाही. महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक ऑक्टोंबरमध्ये होण्याची शक्यता आहे. उद्धव ठाकरे यांच्यामुळे ठाणे आणि जळगाव जिल्हा वगळता भाजपच्या नेतृत्वाखालील एनडीएला राज्यभरात मोठा धक्का बसल्याचे लोकसभा निवडणुकीच्या निकालावरून दिसून येते. त्यामुळे आगामी विधानसभा निवडणुकीत भाजपला राज्यात सर्वाधिक फटका बसविणारा प्रमुख विरोधी चेहरा उद्धव ठाकरे हेच असतील.लोकसभा निवडणुकीतील चांगल्या कामगिरीने ठाकरे यांचा आत्मविश्वास वाढला आहे. पक्षाने मुंबईत चार जागा लढविल्या. त्यापैकी तीन जागा जिंकल्या. १.६० कोटी लोकसंख्या असलेल्या मुंबई शहरात ठाकरे नावाची एक शक्ती अजूनही आहे हे यावरून स्पष्ट झाले. या निकालानंतर पक्ष सोडून गेलेले काही पदाधिकारी पुन्हा उद्धव ठाकरे यांच्याकडे येऊ शकतात अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. उद्धव ठाकरे यांनी पक्ष सोडून गेलेले आमदार, खासदार यांना आपले दरवाजे बंद असतील असे म्हटले आहे. परंतु, काही पदाधिकारी, कार्यकर्ते यांना पक्षात पुन्हा संधी दिली जाऊ शकते. त्याचप्रमाणे विधानसभा निवडणुकीत शरद पवार यांच्या जागी भाजपला बेशरम जनता पार्टी असे संबोधणारे उद्धव ठाकरे हेच भाजपचे प्रमुख विरोधी चेहरा असतील. दुसरीकडे भाजप विरोधातील इंडिया आघाडीतील प्रमुख चेहरा असणारे शरद पवार हे दिल्लीमध्ये महत्वाची भूमिका बजावताना दिसतील. त्याची सुरवात शरद पवार यांनी निकाल लागल्याच्या दिवसापासूनच केली आहे. इंडिया आघाडीने देशात कमालीची सुधारणा केली. त्यामुळे पवार पुन्हा एकदा राष्ट्रीय राजकारणात सक्रिय होतील. अशा परिस्थितीत उद्धव ठाकरे यांच्याकडे महाविकास आघाडीचे नेतृत्व येण्याची शक्यता दिसून येते.

# चिखली येथे सर्व जातीय सामूहिक विवाह सोहळा संपन्न...

## ११२ जोडप्यांनी बांधली विवाहाची गाठ...



**जनसंचलन/ चिखली**

महाराजा अग्रसेन रिसॉर्ट व संजीवनी बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने अशोक अग्रवाल व निवृत्ती जाधव यांच्या आर्थिक प्रयत्नाने चिखली येथे सर्व जातीय सामूहिक विवाह सोहळा संपन्न झाला आहे. या विवाह सोहळ्यामध्ये ११२ जोडप्यांनी विवाहाची गाठ बांधली आहे हा विवाह सोहळा चिखली येथील महाराजा अग्रसेन रिसॉर्ट येथे संपन्न झाला. अनेकांचे या कार्यात सहकार्य मिळाले असून योगदान सुद्धा मिळालेले आहे सदर योगदानामुळे व सर्वांच्या प्रयत्नामुळे हा कार्यक्रम एवढा भव्य दिव्य साजरा करण्यात आला आहे व नवीन जोडप्यांना नव संजीवनी पुरस्काराने पुरस्कृत करण्यात आले आहे तसेच ज्यांनी सहकार्य व मदत केली त्यांचा सत्कार सुद्धा या कार्यक्रमाच्या निमित्ताने करण्यात आला आहे. चिखली येथे झालेला सामूहिक विवाह सोहळा हा लक्षवेधी ठरला आहे. या सोहळ्यामध्ये अनेकांना आपले जीवन साथी मिळालेले आहे. आजच्या काळात लग्न म्हटले तर अनेक खर्च उपस्थित होतात मात्र सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये असे दिसून येत नाही या विवाह सोहळ्यामुळे नव जोडप्यांच्या चेहऱ्यावर हास्य खुललेले दिसून आले आनंद काय असते तो या सामूहिक विवाह सोहळ्यामध्ये दिसून आला आहे.उपस्थितीत लोकांच्या चेहऱ्यावर सुध्दा आनंद दिसून आला आहे

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पुढील चार दिवस जिल्ह्यात पाऊस...

**जनसंचलन/बुलढाणा**

हवामान खात्याने पाच दिवसांच्या जाहीर केलेल्या अंदाजानुसार बुलढाणा जिल्ह्यात आगामी चार दिवस हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता आहे. ८ व ९ जून रोजी जिल्ह्यातील काही भागा अशा स्वरूपाचा पाऊस पडू शकतो. दरम्यान त्यानंतर ११ जूनपर्यंत जिल्ह्यात तुरळक स्वरूपात विजांच्या गडगडाटासह प्रसंगी वादळी वाऱ्यासह पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे. दरम्यान शेतकऱ्यांनी मान्सूनच्या तोंडावर शेतकऱ्यांनी मशागतीची लगबग सुरू केली आहे. काहींनी बी, बियाणे खेरीदस प्राधान्य दिले आहे.



असे असले तरी शेतकऱ्यांनी पुरेसा म्हणजे किमान ७५ मिमी ते १०० मिमीपर्यंत पाऊस झाल्याशिवाय तथा जमिनीमध्ये चांगली ओल असल्याशिवाय पेरणी करू नये, असा कृषी विभागाने शेतकऱ्यांना सल्ला दिली आहे. दरम्यान घाटावरील भागात तुलनेने नगण्य पाऊस झाला असून घाटाखालील भागात तुलनेने चांगला पाऊस झाला आहे.

# भरधाव दुचाकी अनियंत्रित होऊन रस्त्याच्या कडेला लावलेल्या फलकावर धडकल्याने १ जण जागीच ठार

**जनसंचलन/मोताळा**

भरधाव दुचाकी अनियंत्रित होऊन रस्त्याच्या कडेला लावलेल्या फलकावर धडकल्याने १ जण जागीच ठार झाला. ही घटना ३ जून रोजी रात्री मोताळा ते नांदुरा मार्गावर घडली. संजय प्रल्हाद खंडाळकर (वय ४६, रा. आडविहीर) असे मृताचे नाव आहे. तालुक्यातील आडविहीर येथील संजय प्रल्हाद खंडाळकर हे ३ जूनला रात्री १० वाजण्याच्या सुमा त्यांच्या एम. एच. २७/ए.यु. / ५५६५ क्रमांकाच्या दुचाकीने मुलासह मोताळा येथून घरी आडविहीर येथे जात होते. दरम्यान, मोताळा ते नांदुरा मार्गावर एका शाळेसमोर रस्त्याच्या कडेला एका फलकावर




त्यांची दुचाकी धडकल्याने चालक संजय खंडाळकर यांचा मृत्यू झाला. तसेच सोबत असलेला त्यांचा मुलगा जखमी झाला तेथे सोलार प्लँटचे काम सुरू आहे. त्यामुळे त्या ठिकाणी वाहने रस्त्याच्या दोन्ही बाजूला उभी असतात त्या ट्रकचे लाईट चमकल्याने दुचाकी चालक संजय खंडाळकर यांना समोरचे काहींच दिसले नाही.

# हरभरा चोरणाऱ्या चोरट्यास व्यापाऱ्याने पोलिसांच्या स्वाधीन केले

**जनसंचलन/ खामगाव**

खामगाव : येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमधून दिड क्विंटल हरभरा चोरणाऱ्या चोरट्यास व्यापाऱ्याने पोलिसांच्या स्वाधीन केले आहे. येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमधील व्यापारी मयूर पुरुषोत्तम टिबडेवाल (३५) रा. अमृत बाग तलाव रोड यांनी बाजार समिती आवारातील त्यांच्या दुकानासमोर हरभऱ्याचे पोते भरुन ठेवलेले असून बुधवारी रात्री दरम्यान येथून एका चोरट्याने दिड क्विंटल हरभरा लंपास केला. ही घटना गुरुवारी सकाळी मयूर टिबडेवाल यांच्या लक्षात आली. त्यामुळे त्यांनी परिसरात पाहणी केली असता कॉटन मार्केटनजीक एमएसईबीच्या ऑफिसच्या बाजूला असलेल्या गल्लीत त्यांना चोरी केलेला हरभरा दिसून आला. दरम्यान चोरट्यास पकडण्यासाठी टिबडेवाल हे लपून बसले. यावेळी आशिष शिवलाल जोहिरे (२३) रा. सतीफैल हा चोरलेल्या हरभऱ्याचा पोतडया नेण्यासाठी आला असता मयूर टिबडेवाल यांनी त्यास पकडून बाजार समिती कार्यालयात नेले. यावेळी याठिकाणी मोठी गर्दी जमली होती. दरम्यान टिबडेवाल यांनी चोरटा जोहिरे याला शहर पोस्टेला नेवून पोलिसांच्या स्वाधीन केले.

# धोत्रा भनगोजी येथील काकाच्या खून प्रकरणात तिघांवर गुन्हे दाखल...

**जनसंचलन/ चिखली**

शेतीचा वाद विकोपाला गेल्याने सख्ख्या पुतण्याने ट्रॅक्टरद्वारे काकाचा खून केल्याची घटना ६ जूनच्या सायंकाळी घडली होती. या प्रकरणी मृताच्या मुलाने पोलिसांत दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी तिघांवर खुनासह इतर गुन्हे दाखल केले आहेत. धोत्रा भनगोजी येथील खूनप्रकरणी अमडापूर पोलिसात दाखल फिर्यादीवरून सर्व बाबींचा उलगडा झाला आहे. उत्रादा शिवारातील गट क्र. ५५ मधील ८८ आर जमिनीबाबत जनार्धन तुकाराम जोशी व पुतण्या समाधान उत्तम जोशी यांचा वाद होता. याच शेतात समाधान उत्तम जोशी हा सागर समाधान जोशी व संजय श्रीकृष्ण इंगळे यांच्यासमवेत ट्रॅक्टर घेऊन गेला होता व जबरदस्तीने शेतात वखरणी करीत होता. त्यास जनार्धन जोशी यांनी शेत वखरू नका, हे शेत माझे आहे असे बोलत केल्याने समाधान जोशी व सागर जोशी या दोघांनी शिवीगाळ केली तर तिसरा आरोपी संजय इंगळे याने कोणीही मध्ये आले तरी वखरून घे म्हणत चिथावणी दिली. तरीही जनार्धन तुकाराम जोशी बधला नसल्याने तिन्ही आरोपींनी संगनमताने जनार्धन जोशींच्या अंगावर ट्रॅक्टर घालून त्यांचा खून केल्याची फिर्याद मृताचा मुलगा सुधीर जोशी याने पोलिसांत दिली आहे. यावरून पोलिसांनी खून केल्याप्रकरणी तथा अन्य कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. घटनास्थळाला उपविभागीय पोलिस अधिकारी सुधीर पाटील, सहायक पोलिस निरीक्षक सचिन पाटील, पीएसआय धनंजय इंगळे यांनी भेट दिली आहे. दरम्यान, प्रकरणातील आरोपी समाधान उत्तम जोशी व सागर समाधान जोशी या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून, तिसरा आरोपी संजय श्रीकृष्ण इंगळे फरार आहे

# घरफोडीतील सराईत गुन्हेगार पोलिसांच्या जाळ्यात

**जनसंचलन/ शेगाव**

येथे ६ जून रोजी मध्यरात्री मोबाईल चोरी करून गेलेल्या व घरफोडीत सराईत असलेल्या गुन्हेगाराला शहर पोलिसांनी एक तासात पकडून बेड्या ठोकल्या आहेत. रामकृष्ण महादेव जमावे रा. सुदामानगर शहर पोलीस स्टेशनला येऊन त्याचे घरात घरफोडी झाल्याची माहिती दिली व घरफोडीत एक अनोळखी चोरट्याने त्यांचे घरात घुसूनत्यांचा विवो व जिओ कंपनीचा असे २ मोबाईल व त्यांचे किराणा दुकानाचे गल्यातील रक्कम चोरून नेल्याचे सांगितले. सदर माहिती ठाण्यातील पोलिसांनी ठाणेदार हेमंत ठाकरे यांना दिली असता त्याचे मार्गदर्शन व सूचनेप्रमाणे पोस्टेचे नाईट ड्युटीला असलेले पोकाँ जितेंद्र झाडोकार व पोकाँ किशोर साबे यांनी फिर्यादीचे घर परिसरात पेट्रोलिंग करून एका तासाचे आत एक संशयित इसमास ताब्यात घेतले. त्या इसमास पोलीस स्टेशनला आणताच फिर्यादीने त्या संशयिताला ओळखून हाच तो चोरटा असल्याचे पोलिसांना सांगितले. पोलिसांनी त्या चोरट्याला त्याचे नांव गांव विचारले असता त्याने त्याचे नांव विठ्ठल सोपान भांड वय ३० वर्ष राहणार ग्राम तोरणवाडा, तालुका चिखली ह. मु. गौरानगर एमआयडीसी खामगाव असे सांगितले. पोलिसांनी त्या चोरट्याने रेकॉर्ड तपासले असता तो चोरटा खामगाव येथील घरफोडीचा सराईत गुन्हेगार असल्याचे उघड झाले. पोलिसांनी त्याच्या अंगझडतीत फिर्यादीचे




चोरून नेलेले १९ हजार किंमतीचे दोन मोबाईल व दुकानाच्या गल्ल्यातून चोरून नेलेले नगदी ४०० असा एकूण १९ हजार ४४० चा मुद्देमाल मिळून आला. फिर्यादीचे रिपोर्टवरून नमूद आरोपीवर अपराध कलम ४५७, ३८० भादंविप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोहेकाँ गणेश वाकेकर करीत असून आरोपीला घरफोडीच्या गुन्ह्याबाबत विचारपूस सुरू आहे.

# बॅटरी दुकान फोडून ५४ ह. चा ऐवज लंपास

**जनसंचलन/ उदयनगर**

येथील ओम बॅटरी दुकान फोडून अज्ञात चोरट्याने ५४ हजाराचा ऐवज लंपास केला सदर घटना ४ जून रोजी सकाळी उघडकीस आली. याबाबत येथील तुकाराम नगर मधील रहिवासी विलास बलभीम लावंड वय ४२ यांचे बुलढाणा अर्बनचे शेजारी टिनपत्राचे ओम बॅटरी नावाने दुकान असून ते नव्या जुन्या बॅटरी खरेदी विक्री करतात अज्ञात चोरट्याने दुकानचे कुलूप तोडून आत प्रवेश करीत दुकानाच्या मागील लहान दरवाज्यातून नवीन ७ बॅटरी तसेच संजय राठोड, होनमने,तात्या कोरडे, इंगळे, योगेश जावळे यांनी जुन्या बॅटरी चार्जिंग साठी लावलेल्या २० ते २५ जुन्या व भंगार




बॅटरी लंपास करीत ५३५०० रुपयांचा ऐवज लंपास केला अशी फिर्याद विलास लावंड यांनी अमडापूर पोस्टेला दिल्यावर उदयनगर चौकीचे सुमेरसिंह ठाकुर यांनी घटनास्थळी येऊन पाहणी केली. तर चोरट्यांनी माल चोरून नेतांना दुकानाच्या मागील बाजूस ज्या वाहनातुन माल लंपास केला त्या वाहनातील कुट्टी खाली पडल्याचे दिसून आले करिता चोरी गेलेल्या मालाचा शोध घ्यावा अशी मागणी लावंड यांनी केली आहे

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या पथकाने जिल्ह्यातील व शहरातील सोनोग्राफी सेंटर एमटीबी सेंटर व खाजगी रुग्णालयाची केली तपासणी...

## जिल्ह्यात व शहरात कुठे गर्भपात व लिंगभेद तपासणी आढळून आल्यास संपर्क साधावा जिल्हा शल्य चिकित्सक यांची आव्हान...




जनसंचलन/बुलढाणा

बुलढाणा जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष जिल्हा शल्य चिकित्सक सुभाष चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली असलेल्या पथकाने जिल्ह्यातील व शहरातील सोनोग्राफी सेंटर एमटीबी सेंटर व खाजगी रुग्णालयाची तपासणी मोहीम सुरू केली आहे. ही मोहीम १जून २०२४ रोजी सुरू करण्यात आली आहे. या मोहीम पथकामध्ये ३ टीम तयार करण्यात आली आहे. या तिन्ही टीम जिल्ह्यातील व शहरातील सोनोग्राफी सेंटर एमटीबी सेंटर तपासणी करत आहे यामध्ये एक जून रोजी सहा सोनोग्राफी सेंटरची तपासणी करण्यात आली आहे. यासोबतच सहा एमटीबी सेंटर सुद्धा तपासण्यात आले आहे. प्रायव्हेट हॉस्पिटल बॉम्बे नर्सिंग ॲक्ट प्रमाणे शासनाच्या गाईडलाईन प्रमाणे नीट व्यवस्थित सुरू आहे की नाही याची सुद्धा तपासणी केली आहे यामध्ये खाजगी रुग्णालयामधील दहा रुग्णालयाची तपासणी करण्यात आली आहे. सदर घटनेचा अहवाल आ-लेला असून त्या अहवालाचा नीट काळजीपूर्वक अभ्यास करून दोषींवर योग्य ती कारवाई करण्यात येणार आहे यामध्ये बरेच हॉस्पिटल हे स्वच्छतेच्या बाबतीत निष्काळजीप्रमाणे दिसून आले आहे. रुग्णाच्या दोन पलंगांची शासनाच्या नियमाप्रमाणे जे अंतर असायला हवे ते दिसून आले नाही. काही खाजगी वैद्यकीय अधिकारी हे प्रायव्हेट प्रॅक्टिस करत असल्याचे काही ठिकाणी आढळून आले आहे. त्यांच्यावर शासनाच्या नियमाप्रमाणे कारवाई करण्यात येणार असून त्यांचा प्रस्ताव हा पुढे शासनाला पाठविण्यात येणार आहे. सोनोग्राफी सेंटर हे काही चेक झाले असून तर काही बाकी आहे त्याची तपासणी सुद्धा सुरू आहे मात्र यामध्ये लिंग भेद असल्याचे कुठे आढळून आले नाही. बुलढाणा जिल्ह्यातील सर्व जिल्हा वासियांना जिल्हा शल्य चिकित्सक सुभाष चव्हाण यांच्या वतीने आवाहन करण्यात आले आहे की जिल्ह्यात व शहरात कुठल्याही सोनोग्राफी सेंटरवर किंवा इतर ठिकाणी कुठेही लिंगभेद तपासणी किंवा गर्भलिंग निदान आढळून आल्यास आम्हाला त्वरित कळवावे त्यांच्यावर योग्य ती कडक कारवाई करण्यात येणार आहे असे आव्हान त्यांनी यावेळी केले आहे

## घरफोडीतील सराईत गुन्हेगार पोलिसांच्या जाळ्यात

जनसंचलन/ शेगाव

येथे ६ जून रोजी मध्यरात्री मोबाईल चोरी करून गेलेल्या व घरफोडीत सराईत असलेल्या गुन्हे-गाराला शहर पोलिसांनी एक तास-ात पकडून बेड्या ठोकल्या आहेत. रामकृष्ण महादेव जमावे रा. सुदामानगर शहर पोलीस स्टेशनला येऊन त्याचे घरात घरफोडी झाल्याची माहिती दिली व घरफोडीत एक अनोळखी चोरट्याने त्यांचे घरात घुसूनत्यांचा विवो व जिओ कंपनीचा असे २ मोबाईल व त्यांचे किराणा दुकानाचे गल्यातील रक्कम चोरून नेल्याचे सांगितले. सदर माहिती ठाण्यातील पोलिसांनी ठाणेदार हेमंत ठाकरे यांना दिली असता त्याचे मार्गदर्शन व सूचनेप्रमाणे पोस्टेचे नाईट ड्युटीला असलेले पोकाँ जितेंद्र झाडोकार व पोकाँ किशोर साबे यांनी फिर्यादीचे घर परिसरात पेट्रोलिंग करून एका तासाचे आत एक संशयित इसमास ताब्यात घेतले. त्या इसमास पोलीस स्टेशनला आणताच फिर्यादीने त्या संशयिताला ओळ-खून हाच तो चोरटा असल्याचे पोलिसांना सांगितले. पोलिसांनी त्या चोरट्याला त्याचे नांव गांव विचारले असता त्याने त्याचे नांव विठ्ठल सोपान भांड वय ३० वर्ष राहणार ग्राम तोरणवाडा, तालुका चिखली ह. मु. गौरानगर एमआयडीसी खामगाव असे सांगितले. पोलिसांनी त्या चोरट्याने रेकॉर्ड तपासले असता तो चोरटा खामगाव येथील घरफोडीचा सराईत गुन्हेगार असल्याचे उघड झाले.



पोलिसांनी त्याच्या अंगझडतीत फिर्यादीचे चोरून नेलेले १९ हजार किंमतीचे दोन मोबाईल व दुकानाच्या गल्ल्यातून चोरून ने-लेले नगदी ४०० असा एकूण १९ हजार ४४० चा मुद्देमाल मिळून आला. फिर्यादीचे रिपोर्टवरून नमूद आरोपीवर अपराध कलम ४५७, ३८० भादंविप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोहेकाँ गणेश वाकेकर करीत असून आरोपीला घरफोडीच्या गुन्ह्याबाबत विचारपूस सुरू आहे.

## महिलेस मारहाण केल्याप्रकरणी एकाविरूध्द गुन्हा दाखल

जनसंचलन/ धोत्रा भणगोजी

माझे तुझ्याकडे राहिलेले पैसे दे अशी मागणी करत एकाने महिलेस हातोडीने मारून जखमी केले. ही घटना ४ जून रोजी शिरसूर येथे घडली. याबाबत पोलीस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार शिरसूर येथील सरला पुंजाजी घ्याळ ह्या दुर्गेश व कुणाल यांचेसोबत घरात बसलेल्या होत्या. दरम्यान विजय साहेबराव गारडे रा. आंधई हा त्यांच्या घरात घुसला व तुझ्याकडे राहिलेले २० हजार रूपये परत दे असे म्हणाला. यावेळी सदर महिलेने तुझे पैसे पुर्ण वापस केले आहे असे म्हटले. यावरून दोघांमध्ये हा-




तावर हातोडीने वार केले. यामध्ये सरला घ्याळ ह्या जखमी झाल्या. याबाबत सदर महिलेने अमडापूर पोस्टेला तक्रार दिली. यावरून पोलिसांनी विजय गारडे यांचेविरूध्द कलम ३२४, ३२३, ५१२, ५०४, ५०६ भादंविनुसार गुन्हा दाखल केला.

## उपप्रादेशिक परिवहन विभागातर्फे वाहन तपासणी मोहीम

जनसंचलन/बुलडाणा

उपप्रादेशिक कार्यालयातर्फे वाहन तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. यात नियमानुसार नसणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यात येणार आहे. वाहन तपासणी पथकाद्वारे रस्ता सुरक्षेच्या दृष्टिकोनातून विना क्रमांकाची वाहने, वेग मर्यादेपेक्षा अधिक वेगाने रस्त्यावर




धावणाऱ्या वाहन चालकांवर कारवाई करण्यात येत आहे.

## चालकाचे नियंत्रण सुटून मुरुमाचे टिप्पर घरात घुसले जीवित हानी टळली...

जनसंचलन/ खामगाव

मुरुम घेवून जाणारे टिप्पर चालकाचे नियंत्रण सुटल्याने टिप्पर थेट घरात घुसल्याची घटना गुरुवारी सकाळी ९.३० वाजेदरम्यान स्थानिक गजानन कॉलनी भागात घडली. या घटनेत सुदैवाने जीवीत हानी टळली. मात्र घर मालकाचे मोठे नुकसान झाले आहे. गजानन कॉलनी भागातून ६जून रोजी सकाळी टिप्पर क्र. एमएच २८ बीबी ३६७७ हे मुख्म घेवून जात होते. दरम्यान अचानक चालकाचे नियंत्रण सुटल्याने सदर टिप्पर विजय सातपुते यांच्या घरात वॉलकंपाउंडची भिंत तोडून आत घुसले. यावेळी घराबाहेर एक महिला उभी होती. मात्र सुदैवाने या महिलेला काही झाले नाही. सदर टिप्परने वॉल कंपाऊंडच्या भिंतीसह गेट तोडले असून संडासचे टाके देखील फुटले आहे.या अपघातामुळे विजय सातप-ुते यांच्या घराचे मोठे नुकसान झाले आहे. याप्रकरणी वृत्तलिहेपर्यंत पो-लीसात तक्रार दाखल झालेली नव्हती.


दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# मोदींच्या मंत्रिमंडळात विदर्भातून कुणाकुणाला संधी?

वृत्तसंस्था/ नागपूर

मोदी सरकारचे तिसरे पर्व रविवारपासून सुरू आहे. एक दशकापासून संपूर्ण देशभरात पायाभूत सोयींचा ठसा उमटविणारे नितीन गडकरी यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रफुल्ल पटेल आणि बुलडाण्याचे शिवसेनेचे नवनिर्वाचित खासदार प्रतापराव जाधव यापैकी कुणाला संधी मिळते, याकडे वैदर्भीयांचे लक्ष लागले आहे. नरेंद्र मोदी यांचा उद्या, रविवारी सायंकाळी शपथविधी आहे. विदर्भातील कुणाला संधी मिळते, याची उत्सुकता सत्तारुढ पक्षाच्या कार्यकर्त्यांना लागली आहे. नितीन गडकरी यांनी यावेळी हॅटट्रिक केली. पहिल्या मंत्रिमंडळात त्यांच्याकडे रस्ते वाहतुकीसोबत बंदरे होते. दरम्यान, मंत्रिमंडळातील फेरबदल उमा भारती यांच्याकडील जलसंपदा खाते त्यांच्याकडे आले. या काळात पंतप्रधान कृषी संजीवनी योजना, बळीराज योजना अंमलात आली. गोसेखुर्दच्या कामाला वेग देण्याचा प्रयत्न झाला. पहिल्या कार्यकाळात गडकरी यांच्यासोबत चंद्रपूरचे हंसराज अहीर राज्यमंत्री होते. दुसऱ्या कार्यकाळात अकोल्याचे संजय धोत्रे यांनाही संधी मिळाली.नितीन गडकरी यांनी रस्ते वा-हतूक मंत्री म्हणून एक दशकात देशभरात रस्त्यांचे जाळे विणले. उत्तर असो पूर्वोत्तर सर्वीकडे महामार्गांमुळे वाहतूक सोयीस्कर झाली. कामाला प्रचंड वेग देण्यात आला. जम्मू-काश्मिर व हिमाचलमधील रस्ते रूंद करून वाहतुकीची कोंडी सोडवली. अटल टनल पर्यटकांचे आकर्षणाचे केंद्र ठरले आहे. देशभरात सुमारे ५० लाख कोटी रुपयांची कामे असल्याचा त्यांचा दावा आहे. रस्त्यांमुळे देशाच्या कानाकोपऱ्यात त्यांचे नाव पोहोचले.मोदी सरकारच्या तिसऱ्या मंत्रिमंडळात नितीन गडकरी यांना परत संधी मिळेल, असा ठाम विश्वास पक्षाचे स्थानिक नेते व पदाधिकारी व्यक्त करत आहेत.





तथापि, यावेळी चंद्रबाबू नायडू यांनी रस्ते वाहतूक मंत्रालयावर दावा केल्याने त्यांना कोणते खाते मिळते की तेच कायम रा-हाते, याचीही चर्चा सुरू झाली आहे. या खात्याबाबत नायडू यांच्याशी समझोता होऊ शकतो, असे मानले जात आहे. दुसरीकडे गडकरी यांना गृहसारखे अतिमहत्वाचे खाते मिळण्याची चर्चाही सुरू आहे.प्रफुल्ल पटेल ज्येष्ठ सदस्य आहेत. यूपीएच्या काळात त्यांनी प्रदीर्घ काळ केंद्रात मंत्रिपद भूषवले. पहिल्या यूपीएत त्यांच्याकडे नागरी वाहतूक खाते होते. याच काळात बोईंगकडून मोठ्या प्रमाणात विमान खरेदी करण्यात आले. हा सौदा मध्यंतरी बराच गाजला. गेल्यावर्षी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यानंतर अजित पवार महायुतीत सहभागी झाले. केंद्रात एनडीएचा घटक पक्ष म्हणून त्यांच्या गटाकडून मंत्रिपदासाठी दावा केला जाण्याचे संकेत पक्षातील सूत्रांनी दिले. पटेल राष्ट्रीय कार्याध्यक्ष असून दिल्लीत सर्वपक्षीय गोटात त्यांचा चांगला दबदबा आहे. लोकसभेत सुनील तटकरे निवडून आले आहेत. कोकणात नारायण राणे प्रबळ दावेदार आहेत. त्यामुळे कोकण की विदर्भ असा प्रश्नही कार्यकर्त्यांना पडला आहे.बुलडाण्यातून प्रताप जाधव यांनी चौथ्यांदा लोकसभेत प्रवेश केला. पश्चिम विदर्भाला परत संधी मिळावी, अशी कार्यकर्त्यांची भावना आहे. शिंदे सेनेकडून जाधव यांचे नाव समोर केले जाते का, याकडे शिवसैनिकांचे लक्ष लागले आहे. यावेळी भाजपला विदर्भासह राज्यात अपेक्षित यश मिळाले नाही, त्यामुळे मंत्रिमंडळात विदर्भाला किती स्थान मिळते, याची उत्सुकता कार्यकर्त्यांना आहे.

## चालकाचा डोळा लागला अन सावखेड तेजन फाट्याजवळ चिंतामणी लक्झरी पलटली १७ प्रवासी किरकोळ जखमी

जनसंचलन/ सिंदखेडराजा

चालकाचा डोळा लागला अन सा-वखेड तेजन फाट्याजवळ चिंतामणी लक्झरी पलटली १७ प्रवासी किरकोळ जखमी सुदैवाने जीवित हानी टाळली पुणे येथून नागपूरकडे भरधाव वे-गाने जाणारी चिंतामणी ट्रॅव्हल्सच्या चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे ट्रॅव्हल्स पलटी झाल्याची घटना दि ७ जूनच्या सकाळी ५ वा ३० मि घडली, सदर चिंतामणी ट्रॅव्हल्स क्र . एपी ०६ ए ९७४२ या क्रमांकाच्या ट्रॅव्हल्स वर रवी रामचरण राठोड वय ३८ वर्षे रा .रेवणसिद्ध तांडा तालुका औंढा नागनाथ जिल्हा हिंगोली व दुसरा चालक अमोल ज्ञानदेव सातोरे कसुरा तालुका बाळापूर जिल्हा अकोला हे आळीपाळीने ट्रॅव्हल्स चालवायचे ,सदर सावखेड तेजन फाट्यावर सदर चालकाला डूलकी आल्यामुळे चालकाचे नियंत्रण सुटले व ट्रॅव्हल्स पलटी झाली सुदैवाने ट्रॅव्हल्स मधील ३४ पैकी १७ प्रवाशांना किरकोळ मार लागल्यामुळे ग्रामीण रुग्णालय सिंदखेडराजा येथे त्यांना उपचारासाठी भरती करण्यात आले ,सुदैवाने यामध्ये कुठल्याही प्रकारची जीवितहानी झाली नाही,तर उर्वरित १७ जण आहे सुखरूप आहे,जखमी मध्ये योगेश गणेश शेंदुरकर राहणार कोठारी तालुका मंगरूळपीर जिल्हा वाशिम,दिनेश मधुकर राठोड रा-



हणार पिंपळखुटा तालुका दारवा जिल्हा यवतमाळ,संदीप बाबू सिंग राठोड राहणार पिंपळगाव तालुका दारवा जिल्हा यवतमाळ,प्रीतम संतोष पडघान, राहणार आडोळी तालुका जिल्हा , वाशिम ,अंकुश प्रल्हाद पोहाणे राहणार कवठळ तालुका मंगरूळ बीड जिल्हा वाशिम,सुनील मोहन पवार राहणार वार्डाखेर्डा तालुका मानोरा जिल्हा वाशिम,वैष्णवी पुरुषोत्तम अंभोरे रा-हणार सावखेड तालुका बार्शीटाकळी जिल्हा अकोला,उज्वल पुरुषोत्तम अंभोरे राहणार सावखेड तालुका बार्शीटाकळी जिल्हा अकोला,सौरव विजय कोल्हे राहणार शिवणे तालुका पुसद जिल्हा यवतमाळ,सुरेश मानसिंग जाधव भोईनी तालुका मानोरा जिल्हा वाशिम,स्वराज राम राठोड राहणार सावरगाव तालुका मानोरा जिल्हा वाशिम,सदाशिव विष्णू निकष रा-हणार सावत्रा तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा,प्रतीक्षा सदाशिव निकस रा-हणार सावत्रा तालुका मेहकर जिल्हा बुलढाणा,सरस्वती गजानन गायकवाड राहणार वाशिम,मिनाबाई भारत कांबळे राहणार वाशिम,अविनाश भीमराव मोरे राहणार शहापूर जिल्हा वाशिम,दिपाली अविनाश मोरे रा-हणार शहापूर जिल्हा वाशिम अशी किरकोळ जखमी झालेल्या प्रवाशांची नावे असून सदर प्रवासी हे बुलढाणा यवतमाळ व वाशिम जिल्ह्यातील आहेत,यावेळी घटनास्थळी ग्रामस्थांनी व पोलिसांनी तातडीने धाव घेऊन प्रवाशांना गाडीतून बाहेर काढले,

## ग्रामस्थांचे ग्रामपंचायत इमारतीवर चढून आंदोलन

जनसंचलन/मेहकर

बुलढाणा जिल्ह्यातील डोणगाव येथील दहा ते पंधरा ग्रामस्थ हे ग्रामपंचायत इमारतीवर चढुन आंदोलन करत आ-हेत .. गावातील अतिक्रमण तत्काळ काढावे, महिलांना शहरात स्वच्छता गृहाची व्यवस्था करावी , यासह विविध मागणीसाठी हे ग्रामस्थ आक्रमक झाले असून सकाळपासून ग्रामपंचायत इमारतीवर चढून आंदोलन करत आहेत .. तर काही ग्रामस्थ पाण्याच्या टाकीवर चढले तर काही ग्रामस्थ व्यापारी संकुल



वर चढले आहेत आंदोलनकर्त्या ग्रामस्थांच्या हातात पेट्रोलच्यां कॅन असून जर त्यांच्या मागण्या पूर्ण झाल्या नाही, तर अंगावर पेट्रोल घेऊन आत्मदहन करण्याचा इशारा सुद्धा या आंदोलनकर्त्या ग्रामस्थांनी दिलाय

## आयशर उलटून चालक जखमी

जनसंचलन/ साखरखेर्डा

जाणारी कुट्टीची पोतडी साखरखेर्डा ते मेहकर घेऊन जात होता रस्त्यावर आयशर अचानक वाहनासमोर उलटून चालक किरकोळ रोही आल्याने चालकाने जखमी झाला आहे. तर ब्रेक लावण्याचा प्रयत्न संपूर्ण रस्त्यावर केला. परंतु वाहनावरील बांधकामात वापरली नियंत्रण सुटल्याने जाणारी कुट्टी पसरल्याने आयशर उलटले. यात काही वेळ वाहतूक ठप्प चालक किरकोळ जखमी झाली होती. उपरोक्त झाला आहे. घटना ६ जून रोजी दुप-



ारी घटनास्थळी घडली. साखरखेर्डा पोलिसांनी साखरखेर्डा येथून जाऊन वाहन आणि मेहकरकडे एम. एच. २० रोडवरील कुट्टी बाजूला ईएल ५४१९ क्रमांकाचे सारून वाहतूक सुरळीत बांधकामात वापरली केली.